मुख्य कार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन- ४०१ ३०५.

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९
फॅक्स: ०२५०-२५२५१०७.
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र :व.वि.श.म /वृक्षप्राधि/ ९६५४१२३
दिनांक : ३१/११/२०२३

वसई-विरार शहर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण विभाग
जाहिर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ८ (३) क मधील तरतुदीनुसार, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील नमूद वृक्ष कापणे बाबतचा अर्ज वृक्षप्राधिकरण विभागात प्राप्त झालेला असून सदर प्रकरणी सूचना प्रसिदधी पासून ०७ दिवसांकरीता हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. संबंधित अर्ज व इतर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व पत्ता | प्राप्त अर्जाचा दिनांक | झाडाचा प्रकार व नग | मा.वृक्षअधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेला मसुदा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.किशन वासूदेव ठकवाणी, रा- लक्ष्मी छाया बंगलो, गंगोत्री अपार्ट जवळ, अलकापुरी स्टेशनरोड, कलवांनीआई मंदिर समोर, नालासोपारा पूर्व. | २५/०९/२०२३ | नारळ - ०१ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रामधील नमुद अर्जदार यांच्या मालकी जागेत राहत्या घराजवळ धोकादायक सुकलेले नारळाचे झाड असुन झाडाचा झोक हा बाजूला असलेल्या चाळीच्या बाजूने झुकलेला आहे. भविष्यात झाड पडून पत्रे फुटून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने धोकादायक असलेले नारळ प्रजातीचे ०१ झाड कापणे आवश्यक आहे. |
| २ | श्री.पॅट्रीक अंतोन फरेल व वेरॉल अंतोन फरेल, रा- नेवर्लेवाडी, बंगली नाका, सांडोर, वसई (प.) | २०/०६/२०२३ | आंबा -०१ | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रामधील नमुद अर्जदार यांच्या घराच्या बाजूला असलेल्या श्री.दिनेश रघुनाथ राऊत यांच्या मालकी जागेत आंबा प्रजातीचे ०१ झाड असून सदरचे धोकादायक झाड पडल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदरचे आंबा प्रजातीचे ०१ झाड कापणे आवश्यक आहे. (सदरचे झाड कापणेस झाड मालक श्री.दिनेश रघुनाथ राऊत यांनी ना-हरकत पत्र दिलेले आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अर्जदार-<br>मे.नादब्रम्ह को. ऑ. हौ. सो. लि.<br>गाव मौजे आचोळे. | २७/०९/२०२३ | अशोक - ०२<br>नारळ - ०१<br>गुलमोहर - ०१<br>सुरू - ०२<br>बदाम - ०१<br>चिंच - ०१<br><br>**एकूण - ०८** | वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये **प्रभाग समिती "डी"** कार्यक्षेत्रामधील गाव मौजे आचोळे येथिल सर्वे नं.७६ हिस्सा नं.६, प्लॉट नं.४ या भुखंडावर नारळ -०७, अशोक - ३,गुलमोहर -०१, सुरु - ०२, चिंच -०१, बदाम -०१, कडुनिंब -०१ अशी एकूण १६ झाडे अस्तित्वात असून **स्तंभ क्र.४ मध्ये** नमुद असलेली **एकूण ०८ झाडे** नविन इमारत बांधकाम विकासकामा मध्ये बाधित होत असल्याने कापणेस परवानगी मागितलेली आहे. |
| ४ | न्यू राजेश को.ऑ.हौ.सो.लि.<br>राजेश अपार्टमेंट ,<br>प्लॉट नं.५४, सर्वे नं.८२, निळेमोरे, पांचाळनगर, नालासोपारा (प.) ता.वसई, जि.पालघर. | ०६/०३/२०२३ | पिंपळ - ०१ | वसई - विरार शहर महानगरपालिका **प्रभाग समिती "ई"** कार्यक्षेत्राअंतर्गत नमुद अर्जदार सोसायटी पदपथावर महानगरपालिका मालकीचे **पिंपळाचे ०१ झाड** असून सोसायटीच्या वॉल कंपाऊंडच्या बाजूला असलेल्या पाण्याच्या टाकीच्या भिंतीमध्ये जावून भिंतीला तडा गेलेल्या असल्यामुळे टाकीतील पाणी प्राझरते. सदरचे पाणी सोसायटी मधील नागरीक वापरत असून दुषित पाण्यामुळे नागरीकांना आजार होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदरचे झाड कापणेस परवानगी मागितलेली आहे. |

वसई-विरार शहर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण उद्यान विभाग

(नयना ससाणे)
उपआयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका